### विवेकानंद महाविद्यालय

विवेकानंद कॉलेजमध्ये संस्थेचे कार्याध्यक्ष प्राचार्य अभयकुमार साळुंखे यांच्या हस्ते महाराष्ट्र दिनानिमित्त ध्वजारोहण करण्यात आले. संस्थेच्या सेक्रेटरी प्राचार्या शुभांगी गावडे, सीईओ कौस्तुभ गावडे यांची प्रमुख उपस्थिती होती. यावेळी एनसीसीच्या विद्यार्थ्यांनी भारतीय ध्वजास मानवंदना दिली.

ध्वजारोहण व महाराष्ट्राचे राज्य गीत 'गर्जा महाराष्ट्र माझा' गीताने कार्यक्रमाची सुरुवात झाली. प्राचार्य डॉ. आर. आर. कुंभार यांच्या मार्गदर्शनाखाली कार्यक्रमाचे संयोजन जिमखाना प्रमुख डॉ. विकास जाधव मेजर सुनीता भोसले, लेफ्टनंट जे. आर. भरमगोंडा, प्रा. संतोष कुंडले, प्रा. समीर पठाण, प्रा. प्रशांत कांबळे, रजिस्ट्रार एस. के. धनवडे, अधीक्षक संजय दळवी, रवी चौगुले यांनी केले.

3/5/25

3.5.2025


हॅलो प्रभात

# विवेकानंद कॉलेजमध्ये महाराष्ट्र दिन साजरा

कोल्हापूर : हॅलो प्रभात

महाराष्ट्राला संतांची, शाहिरांची, सामाजिक व शैक्षणिक सुधारकांची मोठी परंपरा आहे. त्यामुळेच विविधतेमधील एकता महाराष्ट्र राज्यात देशाच्या एकात्मतेसाठी टिकून राहिलेली आहे. महाराष्ट्र राज्याच्या स्थापनेसाठी अनेकांनी बलिदान दिले. त्यामुळे स्वतंत्र महाराष्ट्र राज्याची निर्मिती झाली.

स्वतंत्र महाराष्ट्र राज्याची स्थापना होणेसाठी कोल्हापूरमधून जनआंदोलन उभे राहिले. यानिमित्त उभारण्यात आलेल्या महिला आंदोलनात संस्थामाता श्रीमती सुशीलादेवी साळुंखे यांचाही महत्वाचा सहभाग होता. महाराष्ट्राची कला, क्रीडा, उद्योग, शैक्षणिक अशा सर्व क्षेत्रात प्रगती होत आहे. आजच्या युवकांनी राज्य ऐक्याच्या भावनेतून देशाला प्रगतीपथाकडे न्यावे. असे विचार श्री स्वामी विवेकानंद शिक्षण संस्थेचे कार्याध्यक्ष प्राचार्य अभयकुमार साळुंखे यांनी ध्वजारोहण समारंभाचे प्रमुख पाहुणे म्हणून बोलताना मांडले.



विवेकानंद कॉलेजमध्ये संस्था कार्याध्यक्ष प्राचार्य साळुंखे यांच्याहस्ते ध्वजारोहण करणेत आले. संस्थेच्या सेक्रेटरी प्राचार्या शुभांगी गावडे व संस्थेचे सी. ई. ओ. कौस्तुभ गावडे यांची प्रमुख उपस्थिती होती. यावेळी एन. सी. सी. च्या विद्यार्थ्यांनी भारतीय ध्वजास मानवंदना दिली.

यावेळी संस्था परिसरातील डॉ. बापूजी साळुंखे इंजिनिअरींग कॉलेज, डॉ. बापूजी साळुंखे हॉटेल मॅनेजमेंट इन्स्टिटयूट, सावित्रीबाई फुले नर्सिंग कॉलेज, न्यू मॉडेल इंग्लिश स्कूल आणि ज्युनिअर कॉलेजचे प्राचार्य, प्राध्यापक, विद्यार्थी, संस्था कार्यालयातील कर्मचारी उपस्थित होते.

Main Edition
May 04, 2025 Page No. 2
Powered by: erelego.com

5/5/25

5/5/25

लोकमत
कोल्हापूर, मंगळवार, दि. ६ मे २०२५



# विवेकानंद महाविद्यालयाचा डालमेट फ्रान्सिस अव्वल

लोकमत न्यूज नेटवर्क



**कोल्हापूर :** विवेकानंद कॉलेजच्या डालमेट केत फ्रान्सिस याने ९८. ३३ टक्के गुण मिळवून विज्ञान शाखेत प्रथम क्रमांक पटकाविला. वाणिज्य शाखेत रेहान डालमेट फ्रान्सिस कित्तूर हिने ९६. ३३ आणि कला शाखेत करण संजय पाटील याने ९३. ३३ टक्के गुण मिळविले.

विज्ञान शाखेत माधुरी जाधव हिने ९३.६७ टक्के गुण मिळविले तर साक्षी शर्मा आणि धृती मगदूम हिने ९३ टक्के गुण मिळविले. दोघींना विभागून तृतीय क्रमांक दिला. वाणिज्य शाखेत नंदना कुलकर्णी ९५.३३, स्वरा दामुगडे हिने ९४.८३ टक्के गुण मिळवून तृतीय क्रमांक पटकाविला. कला शाखेत गौरी मते हिने ८७.५० गुण मिळवून द्वितीय आणि रितेश साळोखे याने ८७.१७ टक्के गुण मिळवून तृतीय क्रमांक पटकाविला.

भूशास्त्र विषयात १०० पैकी १०० गुण पाच विद्यार्थ्यांनी मिळविले. कॉम्प्युटर सायन्स, रसायनशास्त्र, गणित, अकौटन्सी, संस्कृत विषयातही १०० पैकी १०० गुण अनेक विद्यार्थ्यांनी मिळविले.

त्यांना प्राचार्य डॉ. आर. आर. कुंभार, विज्ञान स्कॉलर बॅचप्रमुख प्रा. एस. पी. पाटील, प्रा एस. एन. साळुंखे, वाणिज्य स्कॉलर बॅच प्रमुख प्रा. एस. पी. वेदांते, कला विभागाचे एम. पी. गवळी, प्रा के. जे. गुजर, प्रा. एस. टी. शिंदे, प्रा विश्वंभर कुलकर्णी, प्रा. शिल्पा भोसले, विज्ञान विभागप्रमुख प्रा. एम. आर. नवले आदींचे मार्गदर्शन लाभले.


रेहान कित्तूर


नंदना कुलकर्णी


स्वरा दामुगडे


करण पाटील


गौरी मते


रितेश साळोखे


माधुरी जाधव

पुण्य नगरी

मंगळवार, ६ मे २०२५



डालमेट फ्रान्सिस



रोहन कित्तूर



करण पाटील

## विवेकानंद महाविद्यालय

यावर्षी विज्ञान शाखेत डालमेट कित फ्रान्सिस ९८.३३ टक्के गुणांसह प्रथम क्रमांक संपादन करून अव्वलस्थानी राहिला. माधुरी जाधव ९३.६७ टक्के गुणांसह दुसरी आली. साक्षी शर्मा, द्युती मगदूम हिने ९३ टक्के गुण मिळवून तृतीय क्रमांक पटकावला. वाणिज्यमध्ये प्रथम

तरुण भारत
मंगळवार, ६ मे २०२५

# ‘ज्योतिर्लिंग’मध्ये डिजिटल क्लासरूम

वार्ताहर
वडणगे

निगवे ता. करवीर येथील श्री ज्योतिर्लिंग विद्या मंदिर विद्यालयामध्ये इंटर ॲक्टिव्ह डिजिटल पॅनल बोर्ड क्लासरूमचे उद्‌घाटन मान्यवरांच्या हस्ते करण्यात आले. श्री स्वामी विवेकानंद शिक्षण संस्थेचे मुख्य कार्यकारी अधिकारी कौस्तुभ गावडे यांच्या हस्ते इंटर ॲक्टिव्ह डिजिटल बोर्डचे उद्‌घाटन करण्यात आले. यावेळी वेदक फाउंडेशनच्या प्रोजेक्ट मॅनेजर श्रुती राजू मगदूम, नवनीत पब्लिकेशनचे अधिकारी अभिजीत बोडेकर यांची प्रमुख उपस्थिती होती.

बापूजींच्या तत्वज्ञानाचा आढावा घेऊन समाजासाठी आपण काहीतरी देणे लागतो या भावनेने विद्यालयास मदतीचा हातभार लावल्याचे सांगत जास्तीत जास्त शाळांमध्ये हा प्रोजेक्ट पोहोचवण्याचा आम्ही प्रयत्न करणार आहोत. या शाळेतील विद्यार्थी अधिक गुणवान आहेत त्यापेक्षाही ते गुणवान व्हावेत अशी अपेक्षा यावेळी वेदक फाउंडेशनच्या श्रुती मगदूम यांनी व्यक्त केली. आजच्या जमान्यामध्ये डिजिटल लिटरसी फार गरजेची असल्याचे कौस्तुभ गावडे यांनी आपल्या मनोगतात सांगितले.

विद्यालयाचे मुख्याध्यापक सातपुते पी.एस यांनी मान्यवरांचे स्वागत व प्रास्ताविक केले. यावेळी गुणवंत विद्यार्थ्यांचा सत्कार करण्यात आला. या कार्यक्रमास निगवेच्या सरपंच दिपाली चौगुले, शाळा व्यवस्थापन समितीचे सदस्य नितीन चौगुले, अमर किडगावकर, मदन पाटील, केसरकर, डी.एड कॉलेजचे प्राचार्य पाटील उपस्थित होते. सूत्रसंचालन बांदेकर यु. वाय यांनी केले. मोरबाळे एस व्ही यांनी आभार मानले.



**निगवे : येथील श्री ज्योतिर्लिंग विद्या मंदिर विद्यालयामध्ये डिजिटल क्लासरूमचे उदघाटन प्रसंगी कौस्तुभ गावडे, श्रुती मगदूम, अभिजीत बोडेकर, सरपंच दिपाली चौगुले आदिंसह मान्यवर.**

तरुण भारत
बुधवार, ७ मे २०२५

# 'विवेकानंद'चा तीन तपे गुणवत्तेचा झेंडा कायम



**कोल्हापूर : बारावीतील गुणवंत विद्यार्थ्यांबरोबर प्राचार्य अभयकुमार साळुंखे, प्राचार्य डॉ. आर. आर. कुंभार, शिल्पा भोसले, प्रा. एस. पी. वेदांते, प्रा. एस. टी. शिंदे आदी.**

**प्रतिनिधी**
कोल्हापूर

श्री स्वामी विवेकानंद शिक्षण संस्थेचे, विवेकानंद कॉलेज हे सर्वोच्च गुणवत्तेचे मानदंड ठरले आहे. गुणवंत विद्यार्थ्यांनी आपल्या बुद्धिमतेच्या जोरावर सर्वोच्च स्थानी जाऊन आपल्यातील सुसंस्काराने सामर्थ्यशाली देश घडवावा. बारावी बोर्ड परीक्षेत गेली तीन तपे विज्ञान, वाणिज्य व कला शाखेत सर्वप्रथम येण्याचा बहुमान विवेकानंद कॉलेजने कायम टिकवला आहे, असे प्रतिपादन विवेकानंद शिक्षण संस्थेचे कार्याध्यक्ष प्राचार्य अभयकुमार साळुंखे यांनी व्यक्त केले.

विवेकानंद कॉलेज आयोजित गुणवंत विद्यार्थी सत्कार समारंभात प्रमुख पाहुणे म्हणून ते बोलत होते. विज्ञान शाखेचा डालमेट फ्रान्सिस, माधुरी जाधव, साक्षी शर्मा, श्रुती मगदूम, वाणिज्य शाखेचा रेहान कितूर, नंदना कुलकर्णी, स्वरा दामुगडे, कला शाखेचा करण पाटील, गौरी मते, इंद्रजीत साळोखे तसेच विषयात १०० पैकी १०० गुण संपादन केलेल्या अनेक विद्यार्थ्यांचा सत्कार त्यांच्या हस्ते करण्यात आला.

साळुंखे म्हणाले, विवेकानंद कॉलेजने सर्वसामान्य व गोरगरीब, होतकरू विद्यार्थ्यांना ज्ञानार्जन करते. प्रतिभावंत विद्यार्थ्यांना पैलू पाडण्याचे काम प्रामाणिकपणे केल्याने शिक्षणासह क्रीडा व सांस्कृतिक क्षेत्रात गुणवंत यशाचा झेंडा कायम फडकवीत ठेवीला आहे. प्राचार्य डॉ. आर. आर. कुंभार म्हणाले, विवेकानंद महाविद्यालय स्वायत्त असून सर्वोत्तम कामगिरी करीत आहे. विवेकानंद कॉलेजच्या प्रांगणात सर्व प्रकारची ज्ञान क्षेत्रे विद्यार्थ्यांच्या सर्वांगीण विकासासाठी कार्यरत आहेत. स्वागत व प्रास्ताविक विभाग प्रमुख शिल्पा भोसले यांनी केले. सूत्रसंचालन प्रा. एस. पी. वेदांते यांनी केले. प्रा. एस. टी. शिंदे यांनी आभार मानले.

सकाळ

, शनिवार, १० मे २०२५

# प्रा. संदीप पाटील यांना पीएच.डी.



संदीप पाटील

सांगवडेवाडी : विवेकानंद कॉलेज कोल्हापूर (अधिकार प्रदत्त स्वायत्त) मधील अर्थशास्त्रचे प्रा. संदीप रामगोंडा पाटील यांना शिवाजी विद्यापीठातर्फे अर्थशास्त्र विषयातील पीएच.डी. पदवी मिळाली. प्रा. संदीप पाटील यांनी 'रोल ऑफ कॉमन प्रॉपर्टी रिसोर्सेस इन रुरल डेव्हलपमेंट इन कोल्हापूर डिस्ट्रिक्ट'वर संशोधन केले. त्यांनी प्रा. डॉ. जे. एस. इंगळे यांच्या मार्गदर्शनाखाली संशोधनकार्य पूर्ण केले. त्यांना अर्थशास्त्र विभागप्रमुख प्रा. डॉ. एम. एस. देशमुख, सीनिअर प्रा. डॉ. पी. एस. कांबळे यांचे मार्गदर्शन लाभले. संदीप पाटील यांचे स्वामी विवेकानंद शिक्षण संस्थेचे कार्याध्यक्ष प्राचार्य अभयकुमार साळुंखे, सचिव प्राचार्य शुभांगी गावडे, सीईओ कौस्तुभ गावडे, प्राचार्य डॉ. आर. आर. कुंभार व कर्मचाऱ्यांनी अभिनंदन केले.

तरुण भारत संवाद | शुक्रवार, १६ मे २०२५

# विवेकानंदच्या प्लेसमेंट ड्राईव्हमधून ९ विद्यार्थ्यांची निवड

**कोल्हापूर :** महाविद्यालयाच्या ट्रेनिंग व प्लेसमेंट सेल मार्फत 'प्लेसमेंट ड्राईव्ह' चे आयोजन करण्यात आले होते. यामधून बीएस्सी भाग ३ बायोटेक्नॉलॉजी विभागातील ९ विद्यार्थ्यांची पुणे येथील एनजिन बायोसायन्स् फार्मा कंपनीमध्ये निवड झाली आहे. निवड झालेल्या विद्यार्थ्यांना २.८० एलपीएचे पॅकेज मिळाले. निवड झालेल्या सर्व विद्यार्थ्यांना स्वामी विवेकानंद शिक्षण संस्थेचे कार्याध्यक्ष प्राचार्य अभयकुमार साळुंखे, सचिवा प्राचार्या सौ. शुभांगी गावडे, मुख्य कार्यकारी अधिकारी कौस्तुभ गावडे, प्राचार्य डॉ. आर. आर. कुंभार, डॉ. श्रुती जोशी, प्रा. सतीश चव्हाण, डॉ. संजय लठ्ठे, प्रा. संजय थोरात, डॉ. राजश्री पाटील, डॉ. अस्मिता तपासे, प्रा. पल्लवी देसाई, प्रा. विजय पुजारी, प्रा. एस. जी. कुलकर्णी, डॉ. सलमा मुल्ला, डॉ.आशुतोष उपाध्ये, डॉ. अभिजीत कासारकर, प्रा. वृषाली मिसाळ, सचिन धनवडे यांचे मोलाचे मार्गदर्शन लाभले.

पुढारी MY कोल्हापूर शुक्रवार, १६ मे २०२५

# 'विवेकानंद'च्या विद्यार्थ्यांची नामांकित कंपनीमध्ये निवड

कोल्हापूर : विवेकानंद महाविद्यालयाच्या ट्रेनिंग व प्लेसमेंट सेलमार्फत 'प्लेसमेंट ड्राईव्ह'चे आयोजन करण्यात आले होते. या मधून बीएस्सी भाग ३ बायोटेक्नॉलॉजी (एंटायर)च्या ९ विद्यार्थी पुणे येथील नामांकित कंपनीत निवड झाली आहे.

श्री स्वामी विवेकानंद शिक्षण संस्थेचे कार्याध्यक्ष प्राचार्य अभयकुमार साळुंखे, संस्थेच्या सचिवा प्राचार्या शुभांगी गावडे, मुख्य कार्यकारी अधिकारी कौस्तुभ गावडे, प्राचार्य डॉ. आर. आर. कुंभार, अंतर्गत मूल्यमापन हमी कक्षच्या डॉ. श्रुती जोशी, प्लेसमेंट सेलचे प्रमुख प्रा. सतीश चव्हाण यांचे मार्गदर्शन लाभले.

लोकमत
शनिवार
१७
मे २०२५

# गुणपत्रिका हातात... विद्यार्थी जोमात

लोकमत न्यूज नेटवर्क

**कोल्हापूर :** बारावी निकालाच्या गुणपत्रिका शुक्रवारी विद्यार्थ्यांच्या हातात मिळाल्यानंतर विद्यार्थ्यांनी एकच जल्लोष केला. कोल्हापूर जिल्ह्यांसह शहरातील ३८३ कनिष्ठ महाविद्यालयांमध्ये रांगा लावून विद्यार्थ्यांनी गुणपत्रिका घेतल्या.

गुणपत्रिका मिळाल्याने आता विद्यार्थ्यांचा पुढील शैक्षणिक वर्षासाठी प्रवेशाचा मार्ग मोकळा झाला आहे. विद्यार्थ्यांनी शुक्रवारपासून प्रवेशासाठी महाविद्यालयांमध्ये गर्दी करायला सुरुवात केली. बारावीचा निकाल ५ मे रोजी ऑनलाईन जाहीर झाला. मात्र, गुणपत्रिका मिळाल्या नसल्याने विद्यार्थ्यांना प्रवेश घेता येत नव्हता. शुक्रवारपासून जिल्ह्यातील कनिष्ठ महाविद्यालयांमध्ये गुणपत्रिकांचे वितरण करण्यास सुरुवात करण्यात आली. बारावी परीक्षेत कोल्हापूर जिल्ह्याचा निकाल ९४.४० टक्के लागला असून जिल्ह्यात ३८३ कनिष्ठ महाविद्यालयांतील ४८ हजार ८३६ विद्यार्थ्यांपैकी ४६ हजार १०५ विद्यार्थी उत्तीर्ण झाले आहेत.



कोल्हापूर शहरातील विवेकानंद कॉलेजमध्ये विद्यार्थ्यांनी शुक्रवारी रांग लावून गुणपत्रिका घेतल्या.
छाया : नसीर अत्तार

17.5.25

सकाळ
कोल्हापूर, शनिवार,
१७ मे २०२५

# बारावीच्या विद्यार्थ्यांना गुणपत्रिकांचे वाटप

कोल्हापूर, ता. १६ : बारावीच्या गुणपत्रिकांचे उच्च माध्यमिक शाळा आणि कनिष्ठ महाविद्यालयांमध्ये आज वाटप करण्यात आले. मूळ गुणपत्रिका हातात पडल्यानंतर विद्यार्थ्यांचे चेहरे आनंदाने फुलले.

राज्य माध्यमिक व उच्च माध्यमिक शिक्षण मंडळाने यावर्षी बारावीचा ऑनलाईन निकाल पाच मे रोजी जाहीर केला. त्यानंतर अकरा दिवसांनी शुक्रवारी सकाळी अकराच्या सुमारास शिक्षण मंडळाच्या विभागीय कार्यालयाने गुणपत्रिका, स्थलांतर प्रमाणपत्र, तपशीलवार गुण दर्शविणाऱ्या शालेय अभिलेखाचे उच्च माध्यमिक शाळा आणि कनिष्ठ महाविद्यालयाला वितरण केले. त्यानंतर दुपारी तीनपासून शाळा, महाविद्यालयांमध्ये विद्यार्थ्यांना गुणपत्रिकांचे वाटप करण्यात आले. काही ठिकाणी गुणवंत विद्यार्थ्यांचा सत्कार करून त्यांना गुणपत्रिका देण्यात आल्या. विद्यार्थ्यांना गुणपत्रिकेबरोबर स्थलांतर प्रमाणपत्रदेखील देण्यात आले. पुढील शैक्षणिक संस्थांतील प्रवेशासाठी महत्त्वाची कागदपत्रे हातात पडल्यानंतर विद्यार्थ्यांचे चेहरे आनंदाने फुलले. मूळ गुणपत्रिका मिळाल्याने उद्या, शनिवारपासून पदवी प्रथम वर्षाच्या प्रवेश प्रक्रिया सुरू होणार आहेत.



**कोल्हापूर :** विवेकानंद महाविद्यालयात शुक्रवारी दुपारी बारावीच्या विद्यार्थिनींना गुणपत्रिकांचे वाटप करण्यात आले.

लोकमत
रविवार
१८
मे २०२५

# प्रा. संदीप पाटील यांना पीएच.डी.



सांगवडे : वसगडे (ता. करवीर) येथील व विवेकानंद कॉलेज अर्थशास्त्र विभागातील प्रा. संदीप रामगोंडा पाटील यांना शिवाजी विद्यापीठाने अर्थशास्त्र विषयातील पीएच.डी. प्रदान केली. प्रा. संदीप पाटील यांनी 'रोल ऑफ कॉमन प्रॉपर्टी रिसोर्सेस इन रुरल डेव्हलपमेंट इन कोल्हापूर डिस्ट्रिक्ट' या विषयावर संशोधन केले आहे. त्यांनी प्रा.डॉ. जे.एस. इंगळे यांच्या मार्गदर्शनाखाली आपले संशोधन कार्य पूर्ण केले. त्यासाठी त्यांना अर्थशास्त्र विभागप्रमुख प्रा.डॉ. एम.एस. देशमुख, प्रा.डॉ. पी.एस. कांबळे यांचे मार्गदर्शन लाभले.

19/5/2025

19.5.25

२ पुण्य नगरी ▮ सोमवार, १९ मे २०२५

# प्रा. संदीप पाटील यांना पीएच.डी.



**गांधीनगर :** वसगडे, ता. करवीर येथील प्रा. संदीप पाटील यांना शिवाजी विद्यापीठातर्फे अर्थशास्त्र विषयातील पीएच.डी. पदवी प्रदान करण्यात आली. ते विवेकानंद कॉलेज येथील अर्थशास्त्र विभागात कार्यरत असून, त्यांनी प्रा. डॉ. जे. एस. इंगळे यांच्या मार्गदर्शनाखाली संशोधन पूर्ण केले. त्यांना शिवाजी विद्यापीठाच्या अर्थशास्त्र विभागाचे प्रमुख प्रा. डॉ. एम. एस. देशमुख, प्रा. डॉ. पी. एस. कांबळे यांचे मार्गदर्शन लाभले.

तरुण भारत संवाद

सोमवार, १९ मे २०२५

# या नवरा-बायकोच्या डोक्यात फक्त दगड-धोंडे!

**जागतिक संग्रहालय दिन विशेष**

- संग्रह दगड-धोंड्यांचा माहितीचा
- भूगर्भाचे अंतरंग केले उघड

**कोणी दागिन्याचा संग्रह करतो, कोणी वेगवेगळ्या वस्तूंचा संग्रह करतो, कोणी नाण्यांचा, नोटांचा करतो, पण कोल्हापुरातील नवरा-बायकोच्या एका जोडीचा संग्रह खूप म्हणजे खूप वेगळा आहे आणि हा संग्रह चक्क आपल्या अवतीभवती असलेल्या दगड-धोंड्यांचा आहे. दगड-धोंडे म्हणजे त्याला एवढं काय मूल्य? असा विचार साहजिकच आपल्या प्रत्येकाच्या मनाला चाटून जातो. पण या नवरा बायकोच्या दृष्टीने दगड-धोंड्याचा हा संग्रह केवळ अमूल्य आणि अमूल्य असाच आहे.**

**सुधाकर काशीद**
कोल्हापूर



हा संग्रह कोल्हापूर परिसरातील साऱ्या भूगर्भाचा वेध घेणारा आहे हा वेध म्हणजे एक-दोन नव्हे, शेकडो नव्हे, हजारो नव्हे, पण कोटी वर्षांपूर्वीचा आहे. कोल्हापूरच्या भूगर्भात काय, काय दडून राहिले आहे, याचा हा अस्सल पुरावा या नवरा-बायकोनी संग्रहित केला आहे. एखाद्याचे काहीतरी चुकले तर सहजच म्हणतो, की तुझ्या डोक्यात काय दगड भरले आहेत काय? म्हणजेच बुद्धीचा आणि तुझ्या डोक्याचा काय संबंध आहे, असेच अनेकवेळा सहजपणे म्हणून जातो. दगड-धोंडे म्हणजे त्याला काही किंमत नाही, असेच आपण त्यातून व्यक्त होत असतो. पण या नवरा-बायकोच्या डोक्यात खरोखरच फक्त दगड-धोंडे भरले आहेत आणि त्यांचा संग्रह म्हणजे दगड-धोंड्यांचे पर्यावरणाशी असलेले नाते स्पष्ट करणारे आहे आणि त्यामुळेच, 'होय, आमच्या डोक्यात दगड-धोंडेच भरले आहेत,' असा या जोडीचा अभिमानपूर्वक दावाही आहे.



प्रा. अभिजीत पाटील



प्रा. योगिता पाटील

प्रा. अभिजीत पाटील, प्रा. योगिता पाटील अशी ही दगड-धोंड्यांचा संग्रह करणारी जोडी. अभिजीत हे विवेकानंद महाविद्यालयात आणि योगिता या गोखले कॉलेजमध्ये जीओलॉजीच्या प्राध्यापक आहेत. दगड, धोंडे, माती, डोंगर, टेकड्या'चे अंतरंग हे त्यांच्या अभ्यासाचे विषय. दगड किंवा भूगर्भातील दगडाचे थर याचा जिल्ह्याच्या अनुषंगाने त्यांनी अभ्यास केला आहे. त्यांच्या मते जिल्ह्यातील आजरा परिसरातील भूगर्भातील दगड खूप जुना आहे. उर्वरित जिल्ह्यात बेसॉल्टचा थर आहे.

चंदगड, आजरा, शाहूवाडी, दुर्गमानवाड परिसरात लेटराईटचा दगड आहे, त्यात बॉक्साईट आहे. दगडाचे थर कसे तयार होतात, याचे स्वरूप जिल्ह्यात अगदी सहज दिसून येते. अशा डोंगर कपाऱ्या आहेत. जोतिबा डोंगरावर ६ ते ७ थर दिसतात. पन्हाळ्यावर जकात नाक्यासमोर ८ ते ९ थर दिसतात. गिरगावला १० ते ११ थर दिसतात. पश्चिमेकडील घाट मार्गात हे थर कड्याच्या बाजूला सहज दिसतात. या थरात लाल मातीचा बारीक थर दिसतो. ती लाल माती म्हणजे काव हा रंगकामात उपयोगी घटक आहे. स्तंभरचनेचे दगडी स्तंभ, जोतिबा, पन्हाळा तुमजाई डोंगर, बांदिवडे, मसाई पठार येथे सहज अभ्यासता येतात. दगड-धोंड्याचे हे अंतरंग खूप वेगळे आहेत. त्यात खूप वेगवेगळी खनिजे आहेत. खडक रूपांतराच्या रचना आहेत, जिओलॉजीच्या अभ्यासात त्याचा समावेश आहे.

कोट्यावधी वर्षापासून घडलेला इतिहास त्यात दडला आहे. दूधगंगा, राधानगरी परिसरात वाळूकामय दगड आढळतो. अर्थात भूगर्भातले सर्व संशोधन अद्याप पूर्ण झालेले नाही. ते जेव्हा होईल तेव्हा भूगर्भाचे अंतरंग अधिकच वेगवेगळ्या वैशिष्ट्यांनी उघड होतील. पण या अभ्यासाच्या निमित्ताने अभिजीत पाटील, योगिता पाटील यांनी दगड-धोंड्यांचा संग्रह केला आहे आणि काही काळानंतर यात भरच पडत जाणार आहे. वर वर साधा दिसणारा दगड किती प्राचीन, किती मोलाचा आहे, याची माहिती म्हणजे परिसरातील भूगर्भाचे अंतरंग खुले करणारी आहे. त्यामुळे ही जोडी दगड-धोंड्यांच्या सहवासात आहे. सारे गाव त्यांना म्हणते, यांच्या डोक्यात दगड-धोंडेच भरलेले आहेत. आणि होय, आमच्या डोक्यात दगड-धोंडेच भरले आहेत, असं म्हणताना या जोडीला विशेष अभिमान आहे.

पुढारी

कोल्हापूर, मंगळवार, २० मे २०२५



॥ ज्ञान, विज्ञान आणि सुसंस्कार यांसाठी शिक्षण प्रसार ॥
- शिक्षणमहर्षी डॉ. बापूजी साळुंखे



श्री स्वामी विवेकानंद शिक्षण संस्था, कोल्हापूर संचलित

# VIVEKANAND COLLEGE, KOLHAPUR

**(An Empowered Autonomous Institute)**

2130, E Ward, Tarabai Park, Kolhapur. 416 003.Ph: 0231-2658612,
email - info@vivekanandcollege.org

## APPOINTMENTS

**Applications are invited for the following posts for our BBA, BCA, MBA & MCA programs for the Academic Year 2025-26**

**I PROFESSOR I ASSOCIATE PROFESSOR I**
**I ASSISTANT PROFESSOR I**

1. The Eligibility Criteria, Qualification, Experience, Pay Scales and Service Conditions are as per AICTE/UGC/DTE/Trust norms.
2. Preference will be given to experienced candidates.
3. All eligible candidates are requested to email their application and resume within 10 days on **dean.sob@vivekanandcollege.ac.in**

**Dr. Ramesh Kumbhar**
Principal
Vivekanand College,
Kolhapur

**Prin. Shubhangi Gawade**
Secretary
Shri. Swami Vivekanand
Shikshan Sanstha, Kolhapur

तरुण भारत संवाद ■ बुधवार, २१ मे २०२५

# विवेकानंदच्या विद्यार्थ्यांची प्लास्टिक विरोधी मोहीम

प्रतिनिधी
कोल्हापूर

विवेकानंदमधील अकरावी कला, वाणिज्य विभागातील जवळपास ६०० विद्यार्थ्यांनी जवळपास २०० किलो प्लास्टिकचा राक्षस बाटलीत बंद केला आहे. या मध्ये चॉकलेट, फास्ट रेडी फूडचे, प्लास्टिक पिशवी, स्ट्रॉ अशा बऱ्याच वस्तू आहेत. प्लास्टिक समस्या पर्यावरणासाठी मोठे आव्हान ठरत असताना महाविद्यालयाने राबविलेला हा उपक्रम सर्वांसाठी मार्गदर्शक आहे, असे मत प्राचार्य डॉ. आर. आर. कुंभार यांनी व्यक्त केले. प्लास्टिकमुळे गटारे–प्रवाह तुंबणे, प्राण्यांच्या पोटात जाऊन अडकून बसणे, समुद्रतळाशी जाऊन तेथील जैवविविधता धोक्यात आणणे असे दुष्परिणाम होत आहेत. विवेकानंदच्या विद्यार्थ्यांनी 'प्लास्टिकचा राक्षस करा बाटलीत बंद' या उपक्रमांतर्गत कचरा गोळा केला आहे. प्लास्टिक हे पर्यावरणासाठी एक गंभीर धोका आहे. ते विघटन न होणारे असून हजारो वर्षे जमिनीत राहते. प्लास्टिकमुळे माती, पाणी आणि समुद्री जीवसृष्टीचे मोठे नुकसान होते. त्यामुळे प्लास्टिक वापर कमी करणे आणि पर्यावरणपूरक पर्याय निवडणे ही काळाची गरज आहे. निसर्ग संपदेचे संवर्धन, नैसर्गिक स्तोत्रांचे जतन संस्कार विद्यार्थ्यांमध्ये रुजवण्याचे काम महाविद्यालय करीत आहे. पर्यावरण शिक्षण व जलसुरक्षा या विषयाच्या माध्यमातून तरुणांना सहभागी करून घेण्याची गरज आहे. यासाठी विद्यार्थ्यांना प्राचार्य डॉ. कुंभार, विभागप्रमुख प्रा. एस. एस. भोसले यांनी सहकार्य केले.

■ **प्राचार्य डॉ. आर. आर. कुंभार यांचे मार्गदर्शन**

सकाळ TODAY
कोल्हापूर, बुधवार, २१ मे २०२५


# 'प्लास्टिकचा छंद, करा बाटलीत बंद'

## विवेकानंद ज्युनिअर कॉलेजमध्ये उपक्रम

■ सकाळ वृत्तसेवा

कोल्हापूर, ता. २० : प्लास्टिकमुळे गटारी व प्रवाह तुंबणे, प्राण्यांच्या पोटात जाऊन अडकून बसणे, पाणवठ्यांच्या तळाशी जाऊन जैवविविधता धोक्यात आणणे हे दुष्परिणाम दिसून येत आहेत. यावर उपाय म्हणून विवेकानंद ज्युनियर कॉलेजच्या विद्यार्थ्यांना पर्यावरण शिक्षण विभागामार्फत 'प्लास्टिकचा छंद, करा बाटलीत बंद!' हा उपक्रम राबविला. उपक्रमाद्वारे एकल वापर प्लास्टिक संकलन हाच उद्देश होता.

उपक्रमामध्ये ११ वी आर्टस् आणि कॉमर्समधील जवळपास ६०० विद्यार्थ्यांनी भाग घेऊन जवळपास २०० किलो प्लास्टिक बाटलीत बंद केले. यामध्ये चॉकलेट, फास्ट रेडी फूडचे कागद, प्लास्टिक पिशवी, स्ट्रॉ अशा बऱ्याच प्रकारच्या वस्तू आहेत.

सध्या एकल वापर प्लास्टिक पर्यावरणास घातक ठरत आहे. कारण ते पुनर्वापर करता येत नाहीत पुनर्चक्रीकरणही करणे दुरापास्त आहे, असे पर्यावरण आणि जलसुरक्षा विभागप्रमुख प्रा. अनिल धस यांनी सांगितले. उपक्रमास सचिव व्ही. एन. कुलकर्णी, प्रा. पी. वाय. राठोड यांच्यासह शिक्षक, शिक्षकेतर कर्मचारी व विद्यार्थी यांचे सहकार्य लाभले.



कोल्हापूर : 'प्लास्टिकचा छंद.करा, बाटलीत बंद' उपक्रमांतर्गत तयार केलेली प्लास्टिकची भिंत.

"प्लास्टिक समस्या आज पर्यावरणासाठी मोठे आव्हान ठरत असताना महाविद्यालयाने राबविलेला उपक्रम सर्वांसाठी मार्गदर्शक ठरेल.

**- डॉ. आर. आर. कुंभार,** प्राचार्य

"प्लास्टिक विघटन न होणारे असून हजारो वर्षे जमिनीत राहते. प्लास्टिकमुळे माती, पाणी आणि समुद्री जीवसृष्टीचे नुकसान होत आहे. प्लास्टिक वापर कमी व पर्यावरणपूरक पर्याय निवडणे काळाची गरज आहे.

**- प्रा. शिल्पा भोसले,** विभागप्रमुख

23/5/2025

हॅलो प्रभात

# विवेकानंद महाविद्यालयाच्या विद्यार्थ्यांची प्लॅस्टिक विरोधी मोहिम

कोल्हापूर : हॅलो प्रभात

एकल वापर प्लास्टिक हे पर्यावरणास खूप घातक ठरत आहे. कारण ते पुनर्वापर करता येत नाही, तसेच पुनर्चक्रीकरण ही करणे दुरापास्त असते. मग ते गटारे - प्रवाह तुंबणे , प्राण्यांच्या पोटात जाऊन अडकून बसणे, समुद्रतळाशी जाऊन तेथील जैवविविधता धोक्यात आणणे हे दुष्परिणाम घडवून आणतात. म्हणून त्यानिमित्ताने विवेकानंद ज्युनियर कॉलेज च्या विद्यार्थ्यांना पर्यावरण शिक्षण विभागामार्फत एक उपक्रम दिला होता. त्याचे नाव होते..

प्लास्टिकचा राक्षस.... करा बाटलीत बंद ! एकल वापर प्लास्टिक संकलन हा उपक्रमाचा उद्देश.इयत्ता ११वी आर्ट्स आणि कॉमर्स मधील जवळपास ६०० विद्यार्थ्यांनी

> विवेकानंद महाविद्यालय हे विद्यार्थ्यांच्या सर्वांग विकासासाठी नेहमीच विविध उपक्रम राबवित असते. प्लास्टिक समस्या आज पर्यावरणासाठी मोठे आव्हान ठरत असताना महाविद्यालयाने राबविलेला हा उपक्रम सर्वांसाठी मार्गदर्शक आहे.
>
> – प्राचार्य
> डॉ. आर.आर.कुंभार

यामध्ये भाग घेऊन जवळपास २०० किलो प्लास्टिक चा राक्षस बाटलीत बंद केला आहे. या मध्ये चॉकलेट , प्लास्टिक पिशवी, स्ट्रॉ असे बरेच वस्तू प्रकार आहेत. या उपक्रमासाठी महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. आर.आर.कुंभार, विभागप्रमुख प्रा सौ एस.एस.भोसले, प्राध्यापक व विद्यार्थी यांनी मोलाचे सहकार्य केले आहे.

पुढारी MY कोल्हापूर शनिवार, २४ मे २०२५

# विवेकानंद कनिष्ठ महाविद्यालयाच्या विद्यार्थ्यांची प्लास्टिकविरोधी मोहीम

कोल्हापूर : विवेकानंद कनिष्ठ महाविद्यालयाच्या विद्यार्थ्यांनी प्लास्टिक विरोधी मोहीम सुरू केली आहे. याअंतर्गत प्लास्टिकचा राक्षस करा बाटलीत बंद! एकल वापर प्लास्टिक संकलन हा उपक्रमाचा उद्देश आहे. एकल वापर प्लास्टिक हे पर्यावरणास खूप घातक ठरत आहे. कारण ते पुनर्वापर करता येत नाही, तसेच पुनर्चक्रीकरणही करणे दुरापास्त असते. मग ते गटारे - प्रवाह तुंबणे, प्राण्यांच्या पोटात जाऊन अडकून बसणे, समुद्रतळाशी जाऊन तेथील जैवविविधता धोक्यात आणणे हे दुष्परिणाम घडवून आणतात. विवेकानंद ज्युनिअर कॉलेजच्या विद्यार्थ्यांना पर्यावरण शिक्षण विभागामार्फत उपक्रम हाती घेतला आहे. ६०० विद्यार्थ्यांनी यामध्ये भाग घेऊन २०० किलो प्लास्टिक संकलित केले. उपक्रमासाठी प्राचार्य डॉ. आर. आर. कुंभार, विभागप्रमुख प्रा. एस. एस. भोसले यांचे सहकार्य लाभले.